यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dr_estb@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230051

आस्थापना कक्ष / Establishment Section

जावक क्र. यचममुवि/आस्था/2025/1579-(1) दिनांक - 07.11.2025

# सूचनापत्र

## विद्यापीठातील सेवानिवृत्त सेवकांचे कर्मचारी कल्याण निधी रक्कम परतावा करणेबाबत

(1) विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी कर्मचारी कल्याण निधीमध्ये जमा झालेली रक्कम परत मिळणेबाबत दि. 17 मे 2025 रोजी निवेदन सादर केलेले होते. याबाबत निर्णय घेण्यासाठी वित्त समितीच्या बैठक क्र. 22-2025-26 व व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 203.3.5 नुसार समितीचे गठण करण्यात आलेले होते. सदर समितीची बैठक मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. 07 ऑक्टोबर 2025 रोजी, दुपारी 12.00 वा. विद्यापीठ मुख्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती.

(2) या बैठकीच्या निर्णयानुसार कर्मचारी कल्याण निधीची रक्कम सेवानिवृत्त सेवकांच्या खाती जमा असलेली रक्कम परतावा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने कर्मचारी कल्याण निधीबाबत सेवकनिहाय तपशीलवार माहिती सोबत जोडलेल्या यादीत नमूद केलेली आहे. यादीत नमूद केलेल्या माहितीबाबत काही आक्षेप असल्यास दि. 17.11.2025 पर्यंत आस्थापना कक्षात सादर करावे. तदनंतर कोणतीही बाब विद्यापीठ विचाराधीन राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

- **कर्मचारी कल्याण निधीची रक्कम परत करण्यासाठी विद्यापीठातील सेवानिवृत्त सेवकांनी सोबत दिलेला नमुना अर्ज भरुन व त्यासोबत बँक तपशीलासह (कॅन्सल चेक जोडून) आस्थापना कक्षात दि. 29.11.2025 पर्यंत सादर करावेत.**

कुलसचिव ★ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२ ★ ज्ञानगंगा घरोघरी

(डॉ. गोविंद कतलाकुटे)
कुलसचिव (प्र.)